# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

**महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ कार्यालय, इमारत दुसरा व चौथा मजला, सर्व्हे नं. 832 ए, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे- 411004**

Phone No. - 020-29709617 Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

**प्रसिध्दीपत्रक**
**परीक्षा प्राधान्य**

जा.क्र.मरापप/RIMC/जून/2026/ 602
दि. 13/02/2026

**प्रति,**

**मा. महासंचालक,**
माहिती जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, तळमजला,
मुंबई - 400 032.

**विषय**:- राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेशपात्रता परीक्षा (RIMC) जून 2026 विनामूल्य प्रसिध्दी देणेबाबत.

**संदर्भ**: मा. कमांडंट राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, यांचे क्र. EE//Jun26/NT दि. 09 फेब्रुवारी 2026 रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या **"राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (उत्तराखंड) प्रवेशपात्रता परीक्षा (RIMC) 07 जून, 2026 रोजी घेण्यात येणार आहे**. या संदर्भातील (इंग्रजी व मराठी) विनामूल्य प्रसिध्दीस द्यावयाच्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे.

कृपया सोबतचे प्रसिध्दीपत्रकास राज्यातील सर्व वर्तमानपत्रातून, आकाशवाणी व दूरदर्शनवरुन विनामूल्य प्रसिध्दी देण्यात यावी, अशी विनंती आहे.

**आपला विश्वासू,**

**(महेश चोथे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -4

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

1) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 32.
2) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-1.
3) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास भवन, 1 ला मजला, जुना आग्रा रोड, नाशिक 422 002.
4) मा. आयुक्त, समाजकल्याण विभाग, 3 चर्च रोड, GPO जवळ, पुणे-1
5) मा. महासंचालक, डॉ. बाबसाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे-1.
6) मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, डॉ. ॲनी बेझन्ट मार्ग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे- 411 001.
7) मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), 17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1.
8) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे.
9) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, पुणे-30.
10) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), शिक्षण संचालनालय, डॉ. ॲनी बेझन्ट मार्ग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे- 411 001.
11) मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाषचंद्र बोस रोड, मुंबई.

**ब) प्रत माहिती व कार्यवाहीस्तव सादर:-**

1) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई 400 025 कृपया या निवेदनास त्वरीत प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.
2) मा. संपादक, "शिक्षण संक्रमण" माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर, पुणे-5 कृपया या निवेदनास प्रसिद्धी देण्याची विनंती आहे.
3) मा. संपादक "जीवन शिक्षण" महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, पुणे-30. कृपया या निवेदनास प्रसिद्धी देण्याची विनंती आहे.
4) मा. संपादक दै. ------------------------- कृपया या निवेदनास आपल्या लोकप्रिय दैनिकातून बातमी स्वरुपात प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.
5) मा. व्यवस्थापक ------------------------------ कृपया या निवेदनास आपल्या लोकप्रिय चॅनलवरुन बातमी स्वरुपात प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.

**क) प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:-**

1) संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
2) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक -------------------------- (सर्व)
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक सर्व जिल्हा परिषद यांना त्वरीत कार्यवाहीसाठी
4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सर्व जिल्हा परिषद यांना त्वरीत कार्यवाहीसाठी

# प्रसिध्दीपत्रक

## राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून, उत्तराखंड

## प्रवेशपात्रता परीक्षा जून 2026

**महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी "राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून (उत्तराखंड) येथे फक्त इयत्ता 8 वी साठीची प्रवेशपात्रता परीक्षा आहे" ही परीक्षा दिनांक 07 जून, 2026 रोजी पुणे येथे घेण्यात येणार आहे.**
सदर परीक्षेसाठी मुले व मुली प्रविष्ट होऊ शकतात.

1) **शैक्षणिक पात्रता** : विद्यार्थी / विद्यार्थीनी (उमेदवार) **दि. 01 जानेवारी**, 2027 रोजी कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेमध्ये **इयत्ता 7 वी** वर्गात शिकत असावा किंवा **7 वी उत्तीर्ण** झालेला असावा.

2) **वय** : या परीक्षेसाठी विद्यार्थी / विद्यार्थीनीचे वयोमर्यादा (वय) दिनांक **01 जानेवारी**, 2027 रोजी 11½ (अकरा वर्ष सहा महिने) पेक्षा कमी आणि 13 (तेरा) वर्षापेक्षा अधिक नसावे. म्हणजेच विद्यार्थी / विद्यार्थीनीचा जन्म **दिनांक 02 जानेवारी 2014 च्या आधीचा व दिनांक 01 जुलै 2015** च्या नंतरचा नसावा.

3) **परीक्षा शुल्क** : आवेदनपत्र (फॉर्म) ऑफलाईन किंवा ऑनलाईन पध्दतीने पैसे भरून आपण मागवू शकता:-

4) **आवेदनपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया** :-परीक्षेचे माहितीपत्रक, आवेदनपत्र व जुन्या प्रश्नपत्रिकांचे संच राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून उत्तराखंड पिन कोड- 248003 यांचेमार्फत खालील पद्धतीने मागविता येईल.

अ) **ऑनलाईन पध्दतीने पैसे भरून** परीक्षेसाठी आवेदनपत्र (फॉर्म) व जुन्या प्रश्नपत्रिकांचा संच मा. कमांडंट राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून यांच्याकडून मागविण्याकरीता आपण राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून यांच्या www.rimc.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सर्वसाधरण व इतर संवर्गांकरिता रु. 600/- व अनुसूचित जाती/जमाती करीता रु. 555/- पैसे भरून आवेदनपत्राची (फॉर्मची) मागणी आपणास करता येईल.

ब) **डिमांड ड्राफ्ट द्वारे** परीक्षेसाठी आवेदनपत्र (फॉर्म) मा. कमांडंट राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून यांच्याकडून मागविण्याकरीता सर्वसाधरण संवर्गातील विद्यार्थी (उमेदवार) करीता रु. 600/- चा डी.डी. व अनुसूचित जाती/जमाती करीता रु. 555/- चा डी.डी THE COMMANDANT RIMC FUND, DRAWEE BRANCH, HDFC BANK, BALLUPUR CHOWK, DEHRADUN, (BANK CODE - 1399), UTTARAKHAND यांचे नावाने काढावा. सदर डी. डी. THE COMMANDANT "RASHTRIYA INDIAN MILITARY COLLEGE, DEHRADUN, UTTARAKHAND, 248 003 या पत्त्यावर पाठविणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती/जमाती करीता डी. डी. सोबत **जातीच्या दाखल्याची सत्यप्रत/छायांकितप्रत** पाठविणे बंधनकारक आहे. **डी.डी. पाठवितांना आपल्याला ज्या पत्त्यावर आवेदनपत्र (फॉर्म) मागवायचा आहे तो पत्ता पिन कोड सह अचूक नमूद करावा. तसेच इंग्रजी कॅपिटल अक्षरातच लिहिलेला अथवा टाईप केलेला असावा**. त्यानंतर आपणास आवेदनपत्र (फॉर्म) व मागील 10 वर्षाच्या प्रश्नपत्रिकांचा संच व माहिती पुस्तिका स्पीड पोस्टाव्दारे आपण दिलेल्या पत्त्यावर प्राप्त होईल.

टीप:-

- परीक्षेसाठी मा. कमांडंट "**राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून**, उत्तराखंड, यांचेमार्फत पुरवलेलेच आवेदनपत्र वैद्य/ग्राह्य धरले जाईल.

➢ परीक्षेसाठी मा. कमांडंट **"राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून**, उत्तराखंड, यांचेकडून विहित नमुन्यातीलच आवेदनपत्र (फॉर्म) घ्यावयाचे आहे.स्थानिकरित्या छपाई केलेले/ छायांकित प्रतीतले व RIMC चा होलोग्राम नसलेले आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत.

➢ आवेदनपत्र शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत दिले जाणार नाही.

5) **कागदपत्रे:- आवेदनपत्र (फॉर्म) 2 (दोन) प्रतीमध्ये भरणे आवश्यक आहे. त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे..**

अ) जन्म दाखल्याची छायाप्रत (राजपत्रित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली झेरॉक्स कॉपी)

ब) उमेदवाराचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) प्रमाणपत्र छायाप्रत (राजपत्रित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली झेरॉक्स कॉपी)

क) अनुसूचित जाती/जमातीसाठी जातीच्या दाखल्याची छायाप्रत (झेरॉक्स कॉपी).

ड) विद्यार्थ्याचा फोटो, जन्मतारीख व इयत्तेच्या नोंदीसह शाळेच्या बोनाफाईड सर्टिफिकेटची मूळ प्रत फोटोसह मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने जोडणे आवश्यक आहे.

इ) आवेदनपत्रासोबत विद्यार्थ्याचे/विद्यार्थीनीचे (उमेदवाराचे) आधारकार्ड छायाप्रत (झेरॉक्स कॉपी) जोडणे. बंधनकारक आहे आणि ते जमा न केल्यास विद्यार्थ्याचे/विद्यार्थीनीचे (उमेदवाराचे) आवेदनपत्र (फॉर्म) रद्द करण्यात येईल.

ई) विद्यार्थ्याचे दोन पासपोर्ट आकाराचे फोटो (मागील बाजूस विद्यार्थ्याच्या सहीसह)

उपरोक्त कागदपत्रांच्या छायाप्रत (झेरॉक्स कॉपी) मुख्याध्यापकांमार्फत किंवा राजपत्रित अधिकाऱ्यांमार्फत साक्षांकित (Attested) करून आवेदनपत्रासोबत (फॉर्मसोबत) जोडावेत.

**सूचना** : आवेदनपत्र परीपूर्ण पणे भरून सोबत आवश्यक कागदपत्रे जोडून मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ) भांबुर्डा, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुट सेंटरच्या मागे, शिवाजीनगर पुणे - 411004. या पत्त्यावर **दिनांक 05 एप्रिल 2026** पर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने स्पीड पोस्टाने पाठवावीत किंवा समक्ष येऊन जमा करावीत. कुठल्याही परिस्थितीत आवेदनपत्र RIMC, डेहराडूनकडे जमा करु नयेत.

## परीक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | वार | दिनांक | विषय | वेळ | गुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रविवार | 07/06/2026 | गणित | सकाळी 9:30 ते 11:00 | 200 |
| 2 | | | सामान्य ज्ञान | दुपारी 12:00 ते 1:00 | 75 |
| 3 | | | इंग्रजी | दुपारी 2:30 ते 4:30 | 125 |

- लेखी परीक्षेतून मौखिक परीक्षेस पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना (उमेदवारांना) मौखिक परीक्षा दिनांक यथावकाश कळविण्यात येईल.

आपला विश्वासू,

(महेश चौथे)
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -4

**आधिक माहितीसाठी खाली दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा किंवा खाली दिलेल्या वेबसाईट ला भेट द्यावी.**

Phone No. - 020-29709617 Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

# PRESS NOTE

## Rashtriya Indian Military College (R.I.M.C.) DEHRADUN ENTRANCE EXAMINATION JUNE 2026

The RIMC Entrance Examination for admission of Boys and Girls to **Class VIII** for the **January 2027** term will be held on 7th June 2026 (Sunday) at Pune.

**Eligibility Criterion**

1. **Educational Qualification** :- The candidate should either be studying in **Class VII** or **passed Class VII** from any recognized school at the time of admission to the RIMC, i.e.on 01st January 2027.

2. **Age** :- Boys and Girls both are eligible to apply for admission to the RIMC, Dehradun. The candidate should be in the age bracket of **11½** to 13 years as on **01st January, 2026, i.e. they should not be born earlier than 02 January 2014 and not later than 01 July 2015**. The applicants should be informed that no application for change in the date of birth, that originally given by them would be entertained later by the college authorities.

3. **Procedure to Obtain Application Forms**

   The prospectus - cum - Application Form and Booklet of Old Question Papers can be obtained from The Rashtriya Indian Military College, Garshi Cantt, Dehradun, Uttarakhand, pin -248003 by following methods.

   (a) **Online Payment** :- The Prospectus - cum - Application Form and Booklet of Old Question Papers can be obtained by making online payment of Rs- 600/- for General Candidates & **Rs- 555**/- for SC/ST candidates on RIMC website www.rimc.gov.in ( on receipt of the payment, the Prospectus - cum - Application Form and Booklet of Old Question Papers will be dispatched by Speed Post only.)

   (b) **By Sending Demand Draft**:- The Prospectus - cum - Application Form and Booklet of Old Question Papers can be obtained by sending a written request with a demand draft of **Rs. 600**/- for General Candidates & **Rs** -555/- for SC/ST candidates along with caste certificate in four of **THE COMMANDANT RIMC FUND, DRAWEE BRANCH, HDFC BANK, BALLUPUR CHOWK, DEHRADUN, (BANK CODE - 1399), UTTARAKHAND**. The address should be typed/written clearly in CAPITAL LETTERS with Pin Code and contact number. RIMC will NOT be responsible for any postal delay or loss in transit of prospectus caused by illegible or incomplete address. The delay on part of postal department is not the responsibility of RIMC.

   **Note** :-

   - The Application Form issued by RIMC only shall be valid. Application Forms locally printed/photocopied and without RIMC Hologram (seal) shall not be accepted.
   - Not refund of the application fee will be done under any condition.

4. **Documents**:- Applications are to be submitted in duplicate. The documents which are required to be attached with Application Form are as under

a. Birth Certificate (issued by municipal Corporation/gram Panchayat).

b. Domicile Certificate of the Candidate.

c. SC/ST Certificate (where applicable).

d. A certificate from the Principal of the current School in which the student is studying, with photograph attested stating the date of birth (as per the school records) and the class in which the candidate is studying to be submitted in original.

e. Photocopy of Aadhar Card of the Candidate (both sides) is mandatory requirement failing which application will be rejected.

f. Two passport size photographs

**Note:** - Application Form should reach the Commissioner, Maharashtra State Council of Examination, Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832- A Final Plot No.178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune- 411004 by **05th April 2026** fulfilled as per the norms.

## EXAM TIME TABLE

| Sr.no. | DAY | DATE | Subject | TIME | MARK |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Sunday | 07 June 2026 | Mathematics | 09:30 am to 11:00 am | 200 |
| 2 | | | General Knowledge | 12:00 pm to 1:00 pm | 75 |
| 3 | | | English | 2:30 pm to 4:30 pm | 125 |

The viva - voce will be Conducted of only those Candidates who will qualify the written exam. The dates of same will be intimated later.

(Mahesh Chothe)
Commissioner,
Maharashtra State Council of
Examinations, Pune-4

Contact the number given below for more information or visit the website given below to know more.

Phone No. - 020-29709617 Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in